

# मराठी (प्रथम भाषा) लेख-१६

**आसावरी सुर्वे, शाळा :** विद्या मंदिर, दहिसर

### पूर्वपरीक्षा अपेक्षित उत्तरपत्रिका (क्रमशः)

**प्रश्न ४ (ख) खालीलपैकी कोणत्याही एका काव्यपंक्तीचे संदर्भासहित स्पष्टीकरण करा. (४)**

**'वस्त्या प्रश्नांकित काळोखात बुडाल्या खोल'**

**संदर्भ -** 'व्यवहाराचा काळा घोडा' या काव्यसंग्रहाचे कवी अजीम नवाज राही. या काव्यसंग्रहातील 'दुष्काळ' ही कविता ग्रामीण भागातील दु:खाची घनदाट छाया साकार करते. या दु:खात भविष्याचे प्रश्नचिन्ह भावविश्व गढूळ करते. या प्रश्नांकित काळोखात साऱ्या वस्त्या खोल बुडाल्या आहेत.

**स्पष्टीकरण** - 'दुष्काळ' ही एक नैसर्गिक आपत्ती आहे. या आपत्तीने माणसांचे जीवन विस्कळीत झाले आहे. पाण्याच्या अभावाने सारे वातावरण शुष्क झाले आहे. घरे निर्जीव झाली आहेत. पाण्याचा तळ शोधणारी नजरही निस्तेज झाली आहे. सर्वांनाच उद्याची चिंता लागलेली आहे. चैतन्य हरवलेली घरे, शेते, लोकवस्त्या आणि रानवाटा दुष्काळाने उदास झाल्या आहेत. आपल्या जीवनाच्या मूलभूत गरजांची पूर्तता होणार काय, या विचाराने सारे जनजीवन प्रश्नांकित झाले आहे. एक अगितकता, निराधारतेची भावना, प्रत्येकाचे काळीज जाळत आहे.

**भाषावैशिष्ट्य** - १) दुष्काळामुळे लोकांच्या मनात निर्माण झालेली भविष्याची चिंता काव्यात्मकतेने स्पष्ट केली आहे. २) प्रश्नांकित काळोखाची रम्य प्रतिमा साकार करणारी अर्थपूर्ण काव्यपंक्ती आहे.

**प्रश्न ५ - खालीलपैकी कोणत्याही दोन प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी सुमारे ५० ते ६० शब्दांत लिहा. (८)**

**१)** देव धावला! देव पावला!' ही वामन होवाळ यांची कथा ही कुसा आणि यल्लापाचे भावविश्व रेखाटणारी आहे.

'कुसा' ही देवाला वाहिलेली देवदासी आहे. रूढीचे आणि जुन्या राक्षसी परंपरेचे बंधन घेऊन ती मूकपणे जीवन जगते. डोक्यावर देवाचा जग घेऊन जोगवा मागते. यल्लापा हा तिचा जीवनसाथी आहे. चौंडके वाजवणारा तिचा सहकारी दोघे देवाचा जग घेऊन गावोगाव हिंडतात. नव्या नव्या चालीवर आईची गाणी गात हे फिरत असताना मारुती दादाच्या घराजवळ आले. त्यांना बघून मारुतीदादाचं माथं भडकलं. भीक मागून जगणं मारुतीदादाला मान्य नव्हतं. 'कष्ट करून जगा, जरा माणसासारखं जगा', अशा स्वाभिमानी विचारांचे अंजन मारुतीदादा घालतो. पुढे मात्र कुसा आणि यल्लापाचे मनपरिवर्तन होते.

कष्ट करून आपला जीवनमार्ग सुकर करण्यासाठी त्यांनी निर्धारपूर्वक शहराकडे पावले वळविली. देवाधर्माची भीती, कडक देवस्थानाच्या भ्रामक कल्पना डोक्यातून काढल्या आणि मुंबईकडे लक्ष वेधले. भायखळा मार्केटमध्ये भाजीपाला खरेदी करायचा आणि तो दिवसभर विकायचा. दिवसाकाठी खऱ्या श्रमाचे मोल घ्यायचे. या विलक्षण परिवर्तनाने यल्लापा सुखी झाला. त्याला नव्या जीवनाची कष्टकरी वाट गवसली.

**२)** लेखिका ज्योत्स्ना देवधर यांची 'बेघर' ही कौटुंबिक कहाणी मनाला भिडणारी आहे. या कथेतील 'सुधाताई' ही व्यक्तिरेखा आज आपल्याला प्रातिनिधिक स्वरूपाची आहे, असे वाटते. प्रत्येक घरातील कष्टमय सुधाताई आपल्या जीवनाच्या मावळतीला एकटी असते. बदलत्या जीवनशैलीचे हे उदाहरण आहे.

श्रीकांतसारखा मुलगा जो वार्धक्याचा आधार होता, त्याने सुधाताईंचा विश्वासघात केला. श्रीकांतची पत्नी प्रमिला हिला आपल्या स्वतंत्र घराची उभारणी करायची असते. श्रीकांत आणि प्रमिला यांना आपल्या नवीन घरात 'सुधाताईंची' अडगळ वाटते. स्वत:च्या नवीन घरात बाबांची यश देणारी खुर्ची मात्र त्यांना हवी असते. सुधाताई आपल्या संसाराच्या आणि पतीच्या गोड स्मृती देणारी खुर्ची श्रीकांतला देत नाहीत. तेव्हा त्यांची सूनबाई प्रमिला त्यांना निक्षून सांगते, 'मला माझ्या पद्धतीनं जगायचंय... आणि या ब्लॉकसाठी माझ्या भावानं मदत केलीय.''

या वाक्याने सुधाताईंचे मन वेदनेने चिंब भिजून जाते. आपल्या रक्तामांसाच्या मुलाला आपला विसर पडला. आपल्यापासून तो दूर गेला. सगळे प्रेमाचे, मायेचे रेशीमबंध तुटून गेले. त्या वेळी त्यांना आपल्या एकटीचे आयुष्य सुरू झाले असे वाटते. बदललेल्या जीवनपद्धतीचे दर्शन घडविणारी ही कथा आहे.

**प्रश्न ६- खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर सुमारे २५० ते ३०० शब्दांत निबंध लिहा. (१०)**

### पृथ्वी बोलू लागली तर!

वृक्षदिंडीचा दिवस। प्रत्येक क्षण शुभ्र प्रकाशाने उजळलेला. प्रत्येकाच्या हातात एक लहान रोपटं. चैतन्यानं जगाकडं पाहणारं.

कुणाच्या हाती कृष्णतुळस! मंगलतेचं दर्शन देणारी!

कुणाच्या हाती गुलाबाची उमललेली कळी! वातावरणात मंद मंद सुगंध भरणारी! कुणाच्या हातात सदाफुली! प्रत्येक मुलाच्या हाती असं एक टवटवीत हिरवं स्वप्नं! त्या दिवशी वृक्षदिंडी सुरू झाली. ज्ञान-विज्ञानाचे विचार गंधित झाले. सगळे बालतरू उद्याचे कल्पतरू होण्याची नांदी वाजू लागेल. खरंच हा आनंद सोहळा पाहून 'पृथ्वी बोलू लागली तर'!

तिचे गणगोत तिच्या स्वागतासाठी आलेले पाहून ती हसेल. तो अनाहत नाद सर्व वातावरण भारून टाकेल. आकाशाच्या झारीतून त्यांच्यावर पाण्याचा वर्षाव करील. पृथ्वी सांगू लागेल-

'सुवर्ण पुष्पिता पृथ्वी चिन्वन्ति पुरुषास्त्रय:।
शूरश्च कृतविद्यश्च यश्च जानति सवितुम्।।

अशी अनेक सुवर्णपुष्पे भरलेली आहेत. ही फुले मात्र तीन 'पुरुष गोळा करू शकतात. एक शूर, दुसरा विद्वान आणि तिसरा सेवाधर्म योग्य प्रकारे जाणणारा.'

पृथ्वी आपले वैभवशाली स्वरूप सांगेल. मात्र ते वैभव सामान्य माणसाच्या हाती लागणार नाही. त्यासाठी शौर्य हवे. विद्या हवी. आणि सेवाधर्मही हवा. आळशी व मंदमती अशा माणसांना काहीही मिळवायचे नाही.

स्वार्थी माणसाला पृथ्वीवरील जीवनपुष्प पाहून आपले जीवन सुखमय करता आले नाही. अशी फुले प्रदूषित काजळीने काळी पडली आहेत. सुगंधित फुलांची पाळेमुळे नष्ट झाली आहेत. सावली देणारी झाडे उखडून टाकली आहेत. जंगल उजाड झाले आहे. पर्वतराजी सुकून गेल्या आहेत. दृष्टी मिटून घ्यावी. कारण दिशा गडद झाल्या आहेत. अंधकार दाटला आहे.

माणसाला बुद्धिमत्ता दिली. या बुद्धीचा उपयोग करून आपल्या सोयीनुसार स्वकर्तृत्वाने इमले उभे केले. गगनचुंबी इमारती बांधल्या. नवीन निवारे शोधताना पृथ्वीचे रूपच पालटून गेले. पृथ्वी बोलू लागली तर तिच्या शब्दांना वेदनेचे गहिवर असतील.

बुद्धीच्या सामर्थ्याने शोध-संशोधन करणाऱ्या माणसाविषयी तिला धिक्कार वाटेल. ईर्ष्या, असूया, स्वामित्व आणि स्वार्थी माणसाबद्दल तिला घृणा वाटेल.

आता सेवाधर्मी माणसाबद्दल ती बोलू लागली तर माणसा- माणसामधील नाते उरलेलेच नाही. आज एक माणूस दुसऱ्याला स्वत:च्या स्वार्थासाठी संपवीत आहे. त्याच्यातील मानवता, बंधुता नष्ट झाली आहे. मानवतेच्या भग्नतेने कंठ दाटून येईल. माणुसकीच्या पुष्पांचे निर्माल्य झालेले पाहून तिच्या ओठी हुंदका दाटून येईल.

क्रूर माणसाने तिचा हिरवेपणा हरवून टाकलेला पाहून तिचे शब्द अडले जातील. ती मूक होईल! अश्रूभरल्या डोळ्यांनी मानवातील दानव पाहत राहील.

**उद्याचा विषय : क्रमशः**

**संपर्क :** yashasvibhava2007@gmail.com

लोकसत्ता यशस्वी भव! दहावी अभ्यास मालिका